# इचलकरंजी महानगरपालिका

दि. ०४/०३/२०२४

**प्रशासकीय ठराव क्र. ८१**

प्रस्ताव : मार्केट विभागकडील व्यवसाय परवाना देणेकामी निश्चित केलेले व्यवसाय सोडुन उर्वरीत व्यवसाय मागणीनुसार परवाना देणेबाबत.

प्रस्ताव :

अ) महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ३२२ अ खाली तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेने विशिष्ट वस्तु ठरावीक मर्यादेपर्यंत कोणत्याही जागेत किंवा जागेवर ठेवणेसंबंधी केलेली उपविधी सुची सोबत जोडली आहे .

ब) तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेने कोणत्याही जागेत किंवा जागेवर घरगुती परवानाशिवाय इतर प्रयोजनार्थ विनिर्दिष्ट केलेल्या वस्तु ठेवणे या गोष्टींचे नियमन करण्या संबंधी केलेले ३२२ (१) आणि कलमे २८१ (२) (ब) १४७, ३३८ (२) (अ) आणि त्यांचे परंतुक २ (ब) ३२२ (२) अन्वये मे. कौ.ठ.न. ५०३ दि. २८/०३/२०११ ने मंजुर दिलेल्या व्यवसायाची सुची व निश्चित केलेले दर दि. ०१/०४/२०११ पासुन लागु केलेले आहेत.

सदयस्थितीत इकडुन व्यवसाय सुची नुसार व्यवसाय परवाना देणेत येत आहे. या व्यतिरिक्त सुचीतील व्यवसाय करणारे नागरीकांचे व्यापारी यांचे अर्ज इकडे प्राप्त होत आहेत. त्यांना व्यवसाय परवाना देणेसाठी अन्य व्यवसायाची सुची खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | नविन समाविष्ट करावयाचे व्यवसायाची सुची | उपविधीतील संलग्न् तत्सम व्यवसायाची सुची | मंजुर दर |
|---|---|---|---|
| १ | गुळ रिपॅकींग व विक्री | चहा, कॉफी पावडर साखर साठा व विक्री | २००० |
| | गुळ खरेदी विक्री व साठा | | २००० |
| २ | सर्व प्रकारचे मसाले पदार्थ | किराणा भुसारा माल दुकाने खादय तेल नारळ साठा व विक्री होल सेल | २००० |
| | किरकोळ विक्री व साठा | | २००० |
| | होलसेल विक्री व साठा | | ३००० |
| ३ | शेती अवजारे उपकरण ट्रॅक्टर विक्री खरेदी व रिपेअरी | कृषी बी बीयाने अवजारे तण नाशक व शेती औषधे साठा व विक्री | ३००० |
| ४ | सर्व प्रकारचे गॅरेज (रिपेअरी) २ चाकी, ३ चाकी, ४ चाकी व इतर | स्कुटर ट्रॅक्टर मोटर वगैरे वाहनांची रिपेअरी | १५०० |
| ५ | ऑनलाईन् लॉटरी सेंटर व्यवसाय वेबसाईट तयार करणे व्यवसाय | वेबसाईट तयार करणे व्यवसाय ऑनलाइन लॉटरी सेंटर | १५०० |
| ६ | ऑफिसेस<br>इस्टेट एजंट, मोबाईल सेवा कार्यालय, शेअर मार्केट बोकर्स, प्रायव्हेट एजन्सीज, कमिशन एजंट, कामगार पुरविणे, आर्किटेक्चर ऑफिस व इतर कार्यालय | सर्व प्रकारचे वाणिज्य कार्यालय ऑफिस | २००० |
| ७ | केटरर्स | सर्व प्रकारची भांडी भाडेने देणे | २००० |
| ८ | इलेक्ट्रानिक्स / इलेक्ट्रोकल साठा , विक्री व दुरुस्ती दुकान | मॉल, सुपर मार्केट, किराणा खादय तेल, भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ व कापड, इलेक्ट्रीक इलेक्ट्रॉनिक वस्तु भांडी व इतर तत्सम वस्तु साठा व विक्री | ५००० |
| ९ | नारळ साठा व विक्री | किराणा भुसारा माल दुकाने खादय तेल नारळ साठा व विक्री होलसेल | २००० |
| १० | सिनेमागृह (चित्रपटगृह)<br>व्हीडीओ सेंटर, व्हीडीओ गेम्स | साधे थियटर, व्हीडीओ चित्रपट व्हीडीओ गेम्स | २००० |
| ११ | भांडी दुकान साठा व विक्री | अॅल्युमिनियम, तांबा, पितल स्टील, सिल्व्हर हिंदालियम इ. तत्सम भांडी , वस्तु व धातु साहित्य् साठा व विक्री | २५०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | मेडिकल सर्जिकल्स डिस्ट्रीब्युटर | सर्व प्रकारची औषधे, सर्जिकल साठा व विक्री (मानवी व जनावरे) | २००० |
| १३ | भुजल फुड अॅन्ड बेव्हरेजेस | शुध्द पेयजल प्रकल्प, मिनरल वॉटर (बाटली बंद पाणी साठा व विक्री) | २००० |
| १४ | रंगीत मासे विक्री | | ८०० |
| १५ | ज्वेलर्स शॉप | | ५००० |
| १६ | फळापासुन ज्युस तयार करणे | | २००० |
| १७ | उसापासुन रस तयार करणे | | २००० |
| १८ | कोल्ड्रींक्स | | १५०० |
| १९ | सॉफ्ट कोल्ड्रींग | | |
| २० | गॅस कोल्ड्रींग | | १५०० |
| २१ | पुजेचे साहित्य तोरणासह | | ८०० |
| २२ | जिम, हेल्थ क्लब, जिम्नॅशियम कोचिंग क्लासेस, योगा क्लासेस | | २००० |
| २३ | पोल्ट्री फॉर्मस (कोंबडया) | | १००० |
| २४ | शेळी पालन फॉर्मस | | १००० |
| २५ | ब्युटी पार्लर | | १००० |
| २६ | गिफ्ट शॉपी | | १००० |
| २७ | पाळीव कुत्रे व जनावरे | | ५०० |
| २८ | ए.टी.एम. सेवा | | १२०० |
| २९ | बँकींग आस्थापना | | १५०० |
| ३० | मोटार ड्रायव्हींग ट्रेनिंग स्कुल | | १२०० |
| ३१ | बर्फ, आईस कॅण्डी, आईस फ्रुट किंवा आईस्क्रीम | | १५०० |
| ३२ | डेअरी | | १००० |
| ३३ | चहा व नाष्टा हॉटेल | | १००० |

अ.न. १ ते १३ उपविधीतील संलग्न् तत्स्म व्यवसायाची सुचीनुसार दर निश्चित केलेले आहेत. तसेच अ.न. १४ ते ३३ व्यवसाय परवान्याचे सांगली , मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका दरानुसार निश्चित केलेले असुन वरील सर्वच व्यवसाय सुचीनुसार दर निश्चित करुन मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ८९ / २०२४** दि.०४ /०३/२०२४

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन मे.कौ.ठ.न. ५०३ दि. २८/०३/२०११ अन्वये मंजुर केले दरसुची नुसार व्यवसाय परवाना देणेत येत असुन सद्यस्थितीत मंजुर दर सुचीमध्ये नमुद नसलेले व्यवसायासंबंधी परवाना मिळणेबाबत नागरीकांचे अर्ज इकडे प्राप्त होत असुन सदरकामी प्रस्तावात नमुद नव्याने समाविष्ट केले अ.क्र. १ ते १३ हे संलग्न तत्सम व्यवसायाच्या सुचीनुसार तसेच अ.क्र. १४ ते ३० हे सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका यांचे दरानुसार निश्चित केले दरसुचीनुसार सदर व्यवसाय सुचीस व दर यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच या कामाच्या अंमलबजावणीसाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तसो यांना प्रदान करण्यात येत आहेत.

०४/०३/२०२४

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

खरी नक्कल
५/३/२४
प्रभारी नगरसचिव
इचलकरंजी महानगरपालिका